# सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, नवीन मध्यवर्ती इमारत, २ रा मजला, पुणे -१ यांचे कार्यालय.

फोन नं. २०-२६१२२८४६/४७ फॅक्स नं. ०२०-२६१३३०८२, २६१३०३६०

E-mail-commcoop@rediffmail.com, commcoop२०११@gmail.com (२८२६)


---

३३८६
जा.क्र. गृह/डी-३/हौसिंग संस्था पुनर्विकास/१४-सआ दिनांक :-२७ ऑक्टोंबर, २०१६

प्रति,

१. श्री. जयसिंग भोसले, सरचिटणीस, अभ्युदयनगर को-ऑप. हौ. संस्थांचा संघ लि., समाज मंदिर हॉल, वीर श्रीकांत हडकर मार्ग, काळाचौकी, मुंबई.
२. श्री. डी. जी. बने, पंचशिल का-ऑप. हौ. सो. लि., इमारत क्र. १७ अभ्युदय नगर, काळाचौकी, मुंबई.
३. श्री. सुर्यकांत तानाजी सावंत, अध्यक्ष, ४०/२९६३, अभ्युदयनगर प्रफुल्ल को-ऑप. हौ. सो. लि., काळाचौकी, मुंबई.
४. श्री. प्रकाश र. बेलकर व इतर, अभ्युदयनगर आशिर्वाद हौ. सो. लि., ३९/२८२०, काळाचौकी, मुंबई.
५. श्री. किशोर हरीश्चंद्र शिंदे व इतर, अभ्युदय नगर पवन हौ. सो. लि., ४/२०९, काळाचौकी, मुंबई-३३.
६. श्री. विलास बाळकृष्ण शिंदे, अभ्युदयनगर जयहनुमान हो. सो. लि., ६/४१२, अभ्युदयनगर, मुंबई-३३.
७. श्री. सुशिल लहु माने, गणेशकृपा हौ. सो. लि., १८/१२४६, अभ्युदयनगर, मुंबई – ३३.
८. श्री. दिपक शिवराम कामतेकर व इतर, दत्तधाम हौ. सो. लि., २२/१५७६, अभ्युदयनगर, मुंबई- ३३.
९. श्री. बबन प्रभू आरोटे, साईश्रध्दा हौ. सो. लि., अभ्युदयनगर, मुंबई-३३
१०. श्री. दिलीप नारायण दळवी व इतर, एकता हौ. सो. लि., अभ्युदयनगर, मुंबई-३३.
११. श्री. सतिश गंगाराम रोगे व इतर, श्रीराम हौ. सो. लि. ८/५९३, अभ्युदयनगर, काळाचौकी, मुंबई.
१२. श्रीमती पुनम सिंह, अभ्युदयनगर म्हाडा कॉलनी, काळाचौकी, मुंबई-३३
१३. श्री. वसंत कांबळे, म्हाडा अभ्युदयनगर वसाहत, काळाचोकी, मुंबई-३३.
१४. श्रीमती वैशाली कदम, अभ्युदयनगर म्हाडा वसाहत, वीर श्रीकांत केशव हडकर मार्ग, मुंबई-३३.

**विषय :-** अभ्युदयनगर वसाहतीमधील विविध गृहनिर्माण संस्थेच्या इमारतींचा एकत्रित पुनर्विकास करणेबाबत.

आपण या कार्यालयास सादर केलेल्या तक्रार अर्जातील नमुद मुद्यांचे अनुषंगाने उपनिबंधक, सहकारी संस्था, म्हाडा, मुंबई यांचे कार्यालयाकडून अहवाल मागविणेत आला होता. त्यानुसार त्यांनी या कार्यालयास अहवाल सादर केला आहे. त्यामध्ये असे नमुद केले आहे की, अभ्युदयनगर को-ऑप. हौ. फेडरेशन लि., या संस्थेच्या समितीचा कार्यकाळ दिनांक ३०.६.२०१४ रोजी संपुष्टात आला होता. त्याबाबत सदर फेडरेशनने दिनांक ६.१.२०१४ अन्वये निवडणुक घेणेसाठी म्हाडा कार्यालयास पत्र पाठविले होते. तथापि राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण स्थापनेची प्रक्रिया सुरु असलेबाबत फेडरेशनला दिनांक ६.२.२०१४ चे पत्रान्वये कळविले होते. त्यानंतर दिनांक २०.१०.२०१४ चे आदेशान्वये जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी म्हणून उपनिबंधक, सहकारी संस्था, म्हाडा, मुंबई यांची राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाने नियुक्ती केली होती. सहकारी गृहनिर्माण संस्थांचा संघ ड प्रकारा ऐवजी क प्रकारात येत असल्यामुळे दिनांक १४.८.२०१५ चे आदेशान्वये निवडणुक अधिकाऱ्याची नियुक्ती केली. सदर फेडरेशनच्या एकुण ४७ संस्था सभासद आहेत. सदर सभासद संस्थांच्याही काही संस्थांच्या नवीन व्यवस्थापक समितीच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरु असल्याने प्रारुप मतदार यादी तयार करण्याचा कालावधी वाढविणेबाबत सदर संस्थांकडून विनंती करणेत आली होती. तसेच कांही संस्थांनी जुन्याच व्यवस्थापक समिती सदस्यांमधून प्रतिनिधी पाठविले होते. त्यामुळे संघ व संस्था यांच्यामध्ये वाद निर्माण झाला होता. म्हणून संस्था प्रतिनिधी व संघाचे प्रतिनिधी यांना त्यांचे कार्यालयात सुनावणीस बोलावणेत आले होते. त्यानुसार दिनांक १०.२.२०१६ रोजी निर्णय कळविला होता. त्यानंतर निवडणुकीसाठी निवडणुक अधिकारी यांनी प्रारुप मतदार यादी तयार केली. सदर मतदार यादीबाबत हरकती / सुचना विचारात घेऊन मतदार यादी अंतीम झाल्यावर निवडणुक अधिकारी यांनी दिनांक २५.२.२०१६ रोजी निवडणुक कार्यक्रम घोषित करुन दिनांक २७.३.२०१६ रोजी निवडणुकीची प्रक्रिया गुप्त मतदान पध्दतीने पार

पडली. त्यानुसार दिनांक ४.४.२०१६ रोजी संघाचे अध्यक्ष/सचिव/खजिनदार/व्यवस्थापक समिती सदस्य यांची निवड झाली. सद्या सदर फेडरेशनवर नवीन व्यवस्थापक समिती कार्यरत आहे. अशा स्वरुपाचा अहवाल सादर केला आहे.

सहकारी गृहनिर्माण संस्थांनी अथवा त्यांच्या महासंघाने पुर्नविकासासाठी सर्वसाधारण सभेतील मंजूर ठरावाद्वारे निर्णय घेतले असतील तर सदरचे ठराव रद्द किंवा वैध/अवैध ठरविणेचे अधिकार निबंधकास नसून ते सहकार न्यायालयास आहेत. त्यामुळे प्रस्तुत प्रक्रियेच्या संदर्भात संस्था व सभासद यांचेमध्ये वाद असल्यास किंवा संबंधित गृहनिर्माण संस्थेने चुकीचे निर्णय घेतले असल्यास त्याबाबत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९१ नुसार सहकार न्यायालयात दाद मागणे उचित ठरेल.

मा. सहकार आयुक्त }
यांचे मान्यतेने. }

सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था
महाराष्ट्र राज्य, पुणे करिता.

**प्रत** - उपनिबंधक, सहकारी संस्था, म्हाडा, गृहनिर्माण भवन, रुम नं. २१, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.